


# सोमवंशी पाठारे क्षत्रिय समाजोन्नति संघ

नोंदणी क्र. ए-३९५ (मुंबई)

श्री. गंगाधर पिलाजी चौधरी व श्री. रघुवीर ठक्या पाटील

# त्रैमासिक वृत्तपत्रिका



अंक १४८ | जानेवारी ते डिसेंबर २०२० | वर्ष ४३



* **संपादक**
  दिनेश वासुदेव पाटील
  ८५५४०४५६५५
* **सहसंपादक**
  डॉ.सुचिता प्र. पाटील (निमंत्रक)
  वंदेश दे. पुरव
  जयप्रकाश वा. राऊत
  प्रविणा रा. पुरव
  बिपीन य. पाटील
  श्रीकांत ल. राऊत
* **सल्लागार**
  आमदार हितेंद्र वि. ठाकूर
  आमदार कपिल ह. पाटील
  आमदार क्षितिज हि. ठाकूर
* **विश्वस्त समिती**
  सुधीर आ. राऊत – अध्यक्ष
  ९८२०५७५१९५
  विरेंद्र न. पाटील
  हेमंत ना. राऊत
  मंगेश ग. पाटील
  दिपक ना. पाटील
  राजीव य. पाटील
  दामिनी गो. राऊत
* **संघाचे अध्यक्ष**
  विनय रघुनाथ राऊत
  ९८२३२५११९४७
* **खजिनदार**
  राखी र. पाटील
  ९१४५४५५०५१
* **मुख्य चिटणीस**
  किशोर रा. ठाकूर
  ८५५१८४२४५८
* **सहचिटणीस**
  जयेश रा. राऊत
  आनंद य. राऊत
* **गृहपाल**
  अशोक मो. पाटील
  ९२७३११३७७०
* **सहा. गृहपाल**
  रमाकांत ना. पाटील
  रूपा वि. राऊत
* **ग्रंथपाल**
  रंजना दि. पाटील


संपादकीय

## महासंकट व प्रतिबंधक उपाययोजना कळतंय पण वळत नाही?

संपूर्ण जगाला मेटाकुटीस आणणाऱ्या कोरोना विषाणूच्या संसंर्गावर अद्यापही ठोस उपाय सापडलेला नसला तरीही डॉक्टर, नर्सेस, आरोग्य विभागांचे कर्मचारी, पोलिस तसेच इतर प्रशासकीय यंत्रणा यांच्या भगिरथ प्रयत्नांनी या विषाणूचा फैलाव आटोक्यात येत असल्याचे चित्र दिसायला लागले होते. पण यावर पाणी फेरले जाण्याचे दाखले गणेशोत्सव आणि दिवाळीनंतर मिळाले आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे मिशन बिगिन अगेन अर्थात अनलॉकच्या निर्णयातून अनेक लोकांनी घेतलेला चूकीचा संदेश आणि त्यामुळे कळत-नकळत त्यांच्या वर्तनात आलेली बेफिकीरी.

कोरोना प्रसार संपल्याने अनलॉकचा निर्णय सरकारने घेतलेला नाही. कोरोना प्रसाराच्या वेगात घट करण्याचे प्रयत्न यशस्वी ठरत असुनही कोरोनावर संपूर्ण विजय मिळविणे नजिकच्या भविष्यात शक्य होणार नसल्याचे स्पष्ट झाल्याने लॉकडाऊनचा कालावधी वाढविणे क्रमप्राप्त होते. परंतु तसे केल्यास ते अन्यप्रकारे जीवघेणे ठरणार हे दिसत असल्याने सरकारला अनलॉकचा निर्णय घ्यावा लागला हे सर्वज्ञात आहे. अनलॉकच्या या निर्णयात सर्वकाही एकदम न उघडता टप्प्याटप्प्याने सुट देत जनजीवन पूर्वपदावर आणण्याच्या सरकारी प्रयत्नातील उद्देश लोकांनी समजून घेतला असता तर ते अधिक परिणामकारक ठरले असते. तसे न घडता हे चालू करावे, ते चालू करावे असा अट्टाहास केला गेला. अनलॉक याचा अर्थ, काही लोकांनी कोरोना संकट संपले असा करून घेतला आणि कोरोना प्रसार प्रतिबंधक उपाययोजनांकडे हेतुपुरस्पर दुर्लक्ष करणे चालू केले. तर या उपायोजना सतत करणे कामधंद्याच्या स्वरूपामुळे अडचणीचे ठरत असल्याने काही लोकांनी त्यावर दूर्लक्ष करणे चालू केले. सर्वांनी समजून घेणे गरजेचे आहे की जगात कुठेही ह्या उपाययोजनांना कोणताही पर्याय अजुन तरी नाही. दैनंदिन जीवन पूर्ववत होणे ही जशी गरज आहे तशीच कोरोना प्रसार प्रतिबंधात्मक उपाय योजनांचा अंगिकार करणे ही सुद्धा गरजच आहे.

वेगवेगळ्या भुप्रदेशात आणि वेगवेगळ्या वातावरणात वस्ती करताना सर्व सजिवांनी विशेषत: मानवाने त्या-त्या परिस्थितीशी जुळवून घेतलेच आहे आणि स्वत:ची प्रगतीही करून घेतली आहे. सवयी, गरजा यांत आमुलाग्र बदल करायला लागला असुनही मानवाला ते पूर्वी करावे लागले, आज करावे लागत आहे आणि पुढेही करावे लागणार. परदेशात, परप्रांतात भिन्न नैसर्गिक वातावरण असुनही विद्यार्जन, नोकरी व्यवसायानिमित्त

तेथे जाणारे जीवनशैलीत अशाचप्रकारे परिवर्तन करीत असतात. त्या तुलनेत पाहता कोरोना प्रसार प्रतिबंधक उपाययोजना राबवित जगणे आपल्याला कठीण आहे काय? काय होईल? कामाचा वेग थोडाफार मंदावेल. पण काम बंद होण्यापेक्षा कामाचा वेग थोडाफार कमी होणे परवडणार नाही का? आपल्या किंवा आपल्या प्रियजनांच्या जिवावर बेतणे वा शरीरावर अनिष्ट परिणाम होणे आपल्या आणि आपल्या कुटुंबासाठी किती क्लेशदायक आहे हे पटवून देण्यास कोणाची गरज नाही, हे प्रत्येकजण जाणतोच.

अनलॉकचा गैरअर्थ काढून कोरोना संकट टळले आहे वा कमी झाले आहे हे सोयीस्कररित्या ठरविले जाणे मानवी आरोग्यास किती हानीकारक ठरणार आहे हे येणाऱ्या काळातच दिसणार आहे. परंतु त्याची पुसटशी देखील कल्पना मन अस्वस्थ करणारी आहे हे निश्चित. आधी म्हटल्याप्रमाणे लॉकडाऊन काळात जनजीवन ठप्प झाल्याने लोकांना भयंकर हालअपेष्टांना सामोरे जावे लागले. तसेच अशी परिस्थिती निर्माण झाली की असंख्य लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न गंभीर रूप धारण करेल. त्यामुळे संकट सरलेले नसतानाही, उपाय सापडलेला नसतानाही अनलॉक हे अत्यावश्यक ठरले. परंतु अनेक लोकांनी त्यातून वरीलप्रमाणे गैरअर्थ काढून आपले आचरण चालू केले. यातुन कोरोना प्रसार वाढल्याचे चित्र स्पष्ट होण्यास वेळ लागला नाही.

सण, उत्सव मानवी उत्कर्षास सहाय्यकारी ठरत आले आहेत. परंतु श्वासाद्वारे होणाऱ्या संसर्ग काळात उचित काळजी न घेता साजरे केले तर तेच सण आणि उत्सव मानवी विनाशास कारणीभूत ठरू शकतात हे माहित असूनही, तशा केसेस आसपास बघूनही अनेकांनी आरोग्य सुरक्षिततेकडे काणाडोळा केला आणि उपस्थितीबाबतच्या तसेच इतर सुचनांना केराची टोपली दाखविण्याचे वर्तन अंगिकारले. तसेच देवळे, लग्नादी समारंभ, उत्तरकार्ये यातील उपस्थितीही वाढू लागली आहे. अशावेळी संसर्गग्रस्त व्यक्तींबरोबरील संपर्काचा कालावधी लांबतो. संसर्गग्रस्तांबरोबर  संपर्क जेवढा अधिक वेळ असेल तेवढीच संसर्गाची तसेच विषाणुंचा अधिक डोस शरीरात जाण्याची भिती जास्त हे बेजाबबदारपणे विसरले जात आहे. ह्याबाबी जागरूक नागरिकांना, विचारवंतांना काळजी करायला लावणारी ठरत आहे.

जनजागृती कशास म्हणतात हे बघण्यासाठी जपानचे उदाहरण नक्कीच आदर्श आहे. लॉकडाऊन बंधनकारक न करता त्या देशाच्या सरकारने लोकांना स्वयंस्फुर्त लॉकडाऊन पाळण्याचे फक्त आवाहन केले. जपानी जनतेने या आवाहनास संपुर्ण प्रतिसाद दिल्याने तेथील कोरोना प्रसार जवळजवळ संपुर्ण संपला. पण तरीही यामुळे संकट टळलेले नाही हे ध्यानात ठेऊन बेफिकीरी टाळत कोरोना प्रतिबंधक उपाय योजनांचे पालन करणे त्यांनी सुरूच ठेवले आहे. या विपरित उदाहरण अनेक प्रगत देशांचे आहे. त्यांत पाश्चात्य देशही आले. बेफिकीरी दाखविल्याने किती हाहाकार माजतो, पून:श्च लॉकडाऊन लादण्याची पाळी येते. हे सारे तेथील परिस्थितीने दाखवुन दिले आहे.

कोरोनाबरोबर जगणे म्हणजे कोरोनास अंगात घेऊन जगणे नसून कोरोनास अंगाबाहेर ठेवण्याची पराकाष्ठा करीत जगणे हे सर्वांनीच समजून घेतले पाहिजे. आपल्या आसपास कोरोना विषाणू जरी असला तरीही स्वच्छता, सोशल डिस्टसिंग, मास्कचा वापर अशा अनेक उपायांचा वापर व्यवस्थितपणे केल्याने त्याच्या संसर्गापासून लांब राहणे शक्य आहे हे सर्वांनी अनुभवलेच आहेच. असे प्रतिबंधक उपाय अवलंबल्याने बाधा होणारच नाही असे नाही पण संसर्ग होण्याची शक्यता कमी करण्याचे हे परिणामकारक मार्ग नक्कीच आहेत. या संसर्गापासून आपण स्वत:स आणि आपल्या प्रियजनांस जेवढा काळपर्यंत वाचवू शकणार तेव्हढे वाचवायचा प्रयत्न करणे गरजेचे आहे. मास्कचा वापर करताना त्रास होतो पण तो न वापरल्याने किंवा व्यवस्थित न वापरल्याने शरीरास किती त्रास होऊ शकतो याचा विचार करावयास हवा. घरात किंवा कामाच्या ठिकाणी एकटे असलो तरीही मास्क वापरत काम करण्याची सवय करून घ्यायला हवी. सवय झाली तर सतत मास्क लावून काम करणे सुलभ होऊ शकते.

जगात सर्वत्र चर्चा आहे ती लस कधी उपलब्ध होणार ह्याची. विविध ठिकाणी लस चाचणीचे प्रयत्न अंतिम टप्प्यात असल्याच्या बातम्या कानावर येत आहेतही. हा लेख प्रकाशित होत असताना लस आलेली असेलही पण लोकसंख्येची परिस्थिती लक्षात घेता लसीकरण वेग हा एक महत्त्वाचा आणि चिंतेचा विषय आहे. लशीची परिणामकता, लसीकरणातील धोके याबाबतीत निरिक्षणे जगासमोर यायला किती वेळ लागेल याचा नेम नाही. मानवी शरीर एक न सुटलेले कोडे आहे. मानवी शरीराच्या आणि कार्यपद्धतीच्या संदर्भात असंख्य सुक्ष्म गोष्टी अजुन गूढ आहेत. त्यामुळे लस वा विषाणूचा थेट संपर्क शरीराच्या कार्यावर काय परिणाम करणार आहे हे गूढ राहणारच. दोषपूर्ण अवयवांवर होणारे काही परिणाम दिसले आहेत. उदाहरणार्थ तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन करणाऱ्या व्यक्तींच्या श्वसन आणि अन्ननलिकां तसेच संबंधित अवयवांच्या कार्यक्षमतेवर आधीच परिणाम झालेला असल्याने अशा व्यक्तिंना कोरोना संसर्गाने अतिशय त्रासास तोंड द्यावे लागू शकते आणि तेही त्वरित पण सुद्दढ अवयवांवर आणि प्रतिकारक शक्तीसारख्या अनेक कार्यांवर काय परिणाम होणार हे येणाऱ्या भविष्यातच दिसणार आहे. याव्यतिरिक्त विज्ञानाने दाखवून दिले आहे की, एकाच गोष्टीमुळे भिन्न शरीरांवर विभिन्न परिणाम होऊ शकतात. याचा विचार करता कोणाच्या शरीरास कोणत्या विकाराला सामोरे जाऊ लागेल याचा नेम नाही. लहानग्यांचे शरीर लसीकरणांस चांगला प्रतिसाद देत असते. परंतु मोठ्याच्या बाबतीत तसे ठामपणे सांगता येईल का? कोरोना विषाणूच्या संसर्गातून बरे होण्याचे प्रमाण लहानग्यांमध्ये जास्त असेलही. परंतु त्यांच्या शरीरावरील दुरगामी परिणाम नंतर काही वर्षांनी दिसतील ही शक्यता कशी नाकारता येईल.

त्यात आणखी भर म्हणून विषाणू आपले स्वरूप बदलु शकतो हे वारंवार सांगणाऱ्या तज्ज्ञांच्या म्हणण्याला पूष्टी देणारा प्रकार इंग्लंडमधील कोरोना विषाणूने जगासमोर आणला आहे. विषाणूचा हा प्रकार संसर्गाचा वेग वाढविणारा आहे. ही निसर्गाने दिलेली जणु धोक्याची सुचना आहे हे जाणून. कोरोना विषाणूबाबत येत्या काळातही गाफील न राहणे गरजेचे आहे हे निश्चित.

आणखीन एक चिंतेचा विषय म्हणजे संसर्ग झाल्याचे जाणवुनही लपवणे वा त्याबाबतची खातरजमा न करता इलाज करवून घेणे. यांस कारणीभूत असलेल्या अनेक घटकांपैकी इलाजासंबंधीचे गैरसमज हा महत्त्वाचा घटक आहे. त्याचबरोबर इलाजासाठी पैशांची अवास्तव आकारणी केल्याच्या विविध घटनांमुळेही संबंधित यंत्रणांवर अविश्वास निर्माण झाला. पण अपावादत्मक घटनांना अपवाद म्हणूनच स्थान द्यायचे असते हे आपण मनावर बिंबवायला हवे. अफवा, गैरसमज यामुळे अंतिमतः नूकसान आपलेच होते हे नव्याने सांगायला नको. या संकटात उपलब्ध असलेली अपुरी माहिती, अपुरी संसाधने, अपुरे मनुष्यबळ यांचा सर्वकष विचार करता सरकारी यंत्रणांनी केलेल्या कार्यास तोड नाही, हे सर्वांनी समजून घेतले पाहिजे. या यंत्रणा राबविणारी माणसे काही आकाशातून अवतरलेली नाहीत. ती लोकं आपल्यातीलच आहेत. त्यांच्यातील काही दोषांना, काही चूकांना मोठे करून त्यांच्या प्रयत्नांकडे, कष्टाकडे, त्यांनी पत्करलेल्या धोक्याकडे दूर्लक्ष करण्याइतका कृतज्ञपणा आपण दाखवायचा का? झालेली लागण कुटुंबियांपासून, आपल्या शेजाऱ्यांपासून तसेच आपल्या दैनंदिन जीवनात येणाऱ्या लोकांपासून लपविल्याने उद्‌भवणाऱ्यास परिस्थितीस फक्त आणि फक्त आपणच जबाबदार असणार आहोत हे सदैव ध्यानात ठेवले पाहिजे. अचुक परिणामकारक लस, औषधे यांचा पुरवठा सुरू झाल्यानंतरही काही महिने, कोरोना प्रसार प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अवलंब करणे चालूच ठेवावे लागणार हे वादातीत आहे. आपल्या ज्ञातीतील आणि परिचयांतील अनेक लोकांना या विषाणूची लागण झाली आहे. बहुतांश लोक त्यातून बरेही झाले आहेत. पण जे ही लढाई जिंकू शकले नाही. त्या कुटुंबावर सद्य महासंकटाने केलेल्या आघाताचे गांभीर्य दूर्लक्ष करण्यासारखे नाही, नक्कीच नाही.

❖ ❖ ❖

# वाडवळ अभिमान –
# पालघर एक्सप्रेस श्री. शार्दुल नरेंद्र ठाकूर



क्रिकेट विश्वातील सर्वच मातब्बरांनी सर्वकालीन सर्वोत्तम कसोटी विजय असे म्हटलेल्या विजयाचा पाया रचुन त्यावर कळस चढविण्यातही मोलाची कामगिरी करणाऱ्या माहीम गावातील या समाजबांधवामुळे समस्त जातीचा ऊर अभिमानाने भरून टाकला आहे. दोन वर्षापूर्वी हैदराबाद येथील वेस्टइंडीज विरुद्धच्या कसोटी सामन्यात केवळ १० चेंडु टाकल्यानंतर अचानक उदभवलेल्या दुखापतीमूळे पदार्पणात अंगिभुत गुण दाखविता न आल्याने निराश न होता, किंबहुना दूप्पट जोमाने मेहनत करून क्रिकेटमधील सर्व प्रकारच्या स्वरूपामध्ये सातत्य दाखवत अधिकाराने ब्रिस्बेनमध्ये कसोटी पुनरागमन तर केलेच शिवाय गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातील कौशल्याबरोबरच संघभावना आणि संयमी कणखर मनोबल दाखवत पालघर एक्सप्रेस शार्दुल नरेंद्र ठाकूरने अष्टपैलूत्व सिद्ध केले आहे. सर्वोत्कृष्ट क्रिकेटपटु होण्यास काय पाहीजे हेच जणु शार्दुलने ब्रिस्बेन कसोटीत दाखवुन दिले आहे. एका आक्रमक क्रिकेटपटुने संघाच्या गरजेनुसार संयमीपणा दाखवत उत्कृष्ठ कामगिरी केल्याचे उदाहरण या कामगिरी निमित्ताने क्रिकेट इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिले गेले.

पहिल्यावहिल्या कसोटीत अपेक्षित योगदान देण्याची संधी दुर्देवाने हुकल्याने ब्रिस्बेन कसोटीला शार्दुलची पदार्पणाची कसोटी म्हणणे वावगे ठरणार नाही. याच कारणाने त्या सामन्यानंतर टीम इंडियाचे प्रशिक्षक श्री. रवी शास्त्री यांनी शार्दुलचा उल्लेख डेब्युटंट असा केला. दोन वर्षानंतर पुनरागमन करताना पहिल्याच चेंडूवर बळी हे प्रत्यक्षात उतरवलेलं स्वप्नच. त्यामागील मेहनत, जिद्द आणि कौशल्य याला सलाम. एका डावात २५–३० षटके गोलंदाजी करण्यासाठी आवश्यक असलेला सराव करतानाच फलंदाजी आणि क्षेत्ररक्षणाच्या सरावाकडेही विशेष लक्ष देणाऱ्या या पालघर एक्स्प्रेसने तंदुरुस्तीचेही महत्व स्वतःच्या आचरणाने युवा खेळाडूंसमोर ठेवले आहे. पाच दिवसाचे कसोटी सामना असो, एक दिवसीय लढत असो वा २० षटकांचा क्रिकेट सामना असो, या तिन्ही प्रकारच्या क्रिकेटसाठी लागणारी गुणवत्ता शार्दुलने जोपासली आहे.

पाच महिन्याच्या अखंड विदेश दौऱ्याचा ताण असतानाही पुनरागमन करतानाच्या सामन्यात ४३ षटकांतील १५५ धावांत ७ बळी तसेच २ झेल आणि संघाच्या पहिल्या डावातील ६७ व्या षटकातील ६ बाद १८६ या अत्यंत अडचणीच्या (१८३ धावांच्या पिछाडीच्या ) क्षणी खेळपट्टीवर सुमारे ३६ षटके ठाण मांडत वॉशिंग्टन सुंदर या नवोदिताबरोबर १२३ धावांची अनमोल भागीदारी करताना ११५ चेंडु खेळत संयम आणि आक्रमकतेच्या मिलाफातील ६७ धावा ( भारताच्या त्या डावातील सर्वोच्च वैयक्तिक धावा हेही विशेष ) हे योगदान शार्दुलबाबत सारेकाही सांगून जाते. कसोटी क्रिकेटमध्ये एकंदर १००० वर बळी मिळविलेल्या पॅट कमिन्स, जोश हेझलवुड, मिशेल स्टार्क, नॅथन लायन या गोलंदाजांच्या फळीचा सामना, ऑस्ट्रेलियातील वातावरणांत, तिकडच्या खेळपट्टीवर करताना महेंद्रसिंग धोनी, विराट कोहली, अजिंक्य रहाणे या धुरंधर कर्णधारांकडून वेळोवेळी मिळालेल्या मार्गदर्शनाचा पुरेपूर वापर करत शार्दुलने कसोटीतले पाचही दिवस आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविला. शार्दुल यांस अभिनंदनाबरोबरच असंख्य शुभेच्छा.

शार्दुलच्या जडणघडणीत मोलाचा वाटा असणाऱ्या सर्वांचे, संघ कार्यकर्त्या सौ. हंसा नरेंद्र ठाकूर व श्री. नरेंद्र लक्ष्मण ठाकूर या आईवडिलांचे तसेच काका–काकी श्री. व सौ. जगन्नाथ लक्ष्मण ठाकूर आणि श्री. व सौ. वसंत लक्ष्मण ठाकूर, कुटुंबिय तसेच शार्दुलचे सर्व प्रशिक्षक, चाहते यांचेही हार्दिक अभिनंदन.

# अभिनंदन

## शैक्षणिक अभ्यासक्रम यशस्वी विद्यार्थी

### इयत्ता १० वी

| | |
|---|---|
| अक्षता पराग राऊत | सालवड |
| सुप्रित प्रितम राऊत | अल्याळी |
| सार्थ संतोष पाटील | बोरीवली,(पंचाळी) |
| वेद गोरख राऊत | उमरोळी |
| रियाल राजेश राऊत | अल्याळी |
| अनोखी प्रतिक ठाकूर | वसई (नरपड) |
| शुभ्रा जयेश राऊत | चिंचणी (बोईसर) |
| दिशा संजय राऊत | विरार |
| श्रावणी हरेंद्र राऊत | माहीम |
| विभव पंकज पाटील | पंचाळी |
| कनिषा जयप्रकाश पाटील | केळवे |
| लावण्या सुजित पाटील | अल्याळी |
| ध्रुवी अजित राऊत | मांडे |
| वेद दिपक पाटील | वरोर |
| श्रेय सुनित पाटील | विरार |
| हितोष्णी जितेंद्र पुरव | मधुकरनगर |
| श्रावणी सतीश पाटील | मांडे |
| हार्दीका राकेश पाटील | पंचाळी, धिवली |
| प्रिया मिनेश राऊत | चिंचणी |
| हिमजा सतिश पाटील | माहीम |
| दिपल हर्षराज ठाकूर | तारापूर |
| क्रिश अजित पाटील | अल्याळी |
| अथर्व विवेक पाटील | अल्याळी |
| दिक्षा जितेंद्र राऊत | मधुकरनगर |
| रिया प्रशांत राऊत | मधुकरनगर |
| प्राप्ती अरूण पाटील | पंचाळी |
| हिमांशू जयेश पाटील | पंचाळी |
| सारस पंकज राऊत | वरोर |
| मृगजा संजय पाटील | पंचाळी |
| यश जयेश राऊत | वरोर |
| रीया राजेश पाटील | पंचाळी |
| यश जितेंद्र राऊत | मधुकरनगर |
| मित मंगेश राऊत | वरोर |
| मृणांग कल्पेश पाटील | वरोर |
| मोलिसा नटेश राऊत | अल्याळी |
| विद विशाल पाटील | पंचाळी |
| तनिश निरज राऊत | सालवड |
| अथर्व आनंद राऊत | सालवड |
| सार्थ निलेश राऊत | सालवड |
| पार्थ निलेश राऊत | सालवड |
| हर्ष देवेंद्र पाटील | सालवड |
| आदित जितेंद्र पाटील | सालवड |
| आलाप तुषार राऊत | सालवड |
| मैत्री राकेश राऊत | सालवड |
| कुणाली कल्पेश राऊत | सालवड |
| केशवी मंगेश पाटील | सालवड |
| अवनी भुपेंद्र राऊत | उमरोळी |
| निर्मिती पंकजकुमार पाटील | माहीम |

### इयत्ता १२ वी


| | |
|---|---|
| भाविका अजय पाटील(वाणिज्य) | पंचाळी |
| नचिकेत प्रशांत पाटील | वरोर |
| कनिका राजेश राऊत | उमरोळी |
| अनुष्का भरत पाटील | विरार |
| हेमिका जयवंत ठाकूर(विज्ञान) | विरार, (पंचाळी) |
| दिवेश उल्हास राऊत (वाणिज्य) | मांडे |
| अनुष्का धनेश राऊत | अल्याळी |
| जय जगदीश पाटील | मधुकरनगर |
| सानिका देवेंद्र पुरव | मधुकरनगर |
| सानिका रामचंद्र पाटील (वाणिज्य) | पंचाळी |
| वेदश्री धिरेश पाटील | माहीम |
| इशा राजीव राऊत | माहीम |
| पूर्वा निलेश राऊत | माहीम |

### पदवीधर आणि उच्च पदवीधर

| | |
|---|---|
| प्रियेश चारुशील पाटील M.B.A | विरार (बोईसर) |
| तनय नयनित राऊत M. S. | उमरोळी |
| जय राजीव राऊत B. E. Mech. | उमरोळी/आफ्रिका |
| यश भुपेश ठाकूर B.E.CIVIL | पंचाळी |
| निराग मिनेश राऊत B.Arch | चिंचणी |
| पूर्वा हेमंत पाटील M.M.S. | पंचाळी |
| तन्वी राजेंद्र पाटील M.Com. | पंचाळी |
| हिना जगदिश पाटील M.Com. | पंचाळी |
| तेजल सुशील पाटील M.Com. | पंचाळी |
| दिक्षा राजेश पाटील B.COM | पंचाळी |
| प्रित धनंजय राऊत Dipl in F T | भिवंडी/केळवे |

# भावपूर्ण श्रध्दांजली

## माजी विश्वस्त शंकर नारायण राऊत



संघाचे माजी विश्वस्त, माजी अध्यक्ष श्री शंकर नारायण राऊत उर्फ शंकर अण्णा यांचे १०१ व्या वर्षी निधन झाले. अण्णांनी मॅट्रिक शिक्षण पूर्ण केल्यावर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज मधून इंटरसायन्स पूर्ण केले. त्यांनी काही काळ बँकेत नोकरी केली. सामाजिक , राजकीय, सहकारी, शैक्षणिक , कृषी, औद्योगिक संस्थेत त्यांनी निरनिराळ्या पदावर राहून कार्य केले आहे. त्यांनी शेतीवाडी बरोबर १९५४–५५ साली पानवेलीचा व्यवसायही सुरू केला. माहीम एज्युकेशन सोसायटीचे त्यांनी मानद सचिव म्हणून कामकाज पाहिले. माहीम हायस्कुलमध्ये इंग्रजी माध्यमात सुरुवातीचे तीन वर्षे विनामूल्य शिकविले. या संस्थेत ट्रस्टी पद भूषविले. औद्योगिक शिक्षण संस्थेत त्यांचा सक्रिय सहभाग होता. औद्योगिक शाळेसाठी जागा मिळवून देण्यात त्यांचा मोठा वाटा होता. पाणेरी पाणी वाटप संस्थेची स्थापना केली. पाणेरी बंधाऱ्याला सिंचनाकरिता सुर्या प्रकल्पाचे पाणी त्यांनी प्रयत्न करून मंजूर करून घेतले. १९८४ साली माहीम दुग्ध विकास संस्थेची स्थापना करून दुग्ध व्यवसायास चालना दिली. माहीम विविध कार्यकारी संस्थेत अंतर्गत हिशोबतपासनीस, संचालक , सल्लागार अशा पदावर काम केले. माहीम सोसायटीला गॅस एजन्सी मिळवून देण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. माहीम येथील मिठागरात ते अनेक वर्षे सल्लागार होते. ज्ञानमंदिर ट्रस्ट मध्ये कार्यकारी विश्वस्त म्हणून कार्य केले. ट्रस्टतर्फे इंजिनिअरिंग कॉलेज चालू करायचे त्यांचे स्वप्न काही तांत्रिक कारणामुळे अपुरे राहिले. सो पा क्ष गणेशोत्सव मंडळ, माहीम याचे ते सलग सहा वर्षे अध्यक्ष होते. या गणेशोत्सव मंडळाच्या हॉलचे भूमिपूजन अण्णांच्या हस्ते झाले. सो पा क्ष स संघ, ट्रस्ट फंड च्या सन १९७५ मध्ये मांडे येथील अधिवेशनात त्यांनी अध्यक्षपद भूषविले. सो पा क्ष स संघ ट्रस्ट फंड संस्थेचे १० वर्षे त्यांनी विश्वस्त म्हणून कार्य केले. शतायूषी शंकर अण्णांना संघातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.






# भावपूर्ण श्रध्दांजली



श्री. रघुनाथ सखाराम राऊत

## संघाचे माजी अध्यक्ष श्री. रघुनाथ सखाराम राऊत

संघाचे माजी अध्यक्ष श्री. रघुनाथ सखाराम राऊत यांना मंगळवार दिनांक ८ डिसेंबर २०२० रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी देवाज्ञा झाली. एक उत्कृष्ट शेतकरी म्हणून लौकिकप्राप्त आणि र स राऊत या नावाने सुपरिचित असलेल्या शांत, संयमी भाईंनी संघात शाखा चिटणीस, गृहपाल, चिटणीस, खजिनदार व १९९९–२००० मध्ये संघाचे अध्यक्षपद सांभाळताना संघाच्या उमरोळी शाखेतील वार्षिक अधिवेशनाचे अध्यक्षपद भूषविले आहे. भाऊराव देवजी पाटील विद्यार्थी वसतिगृह उभारणीत त्यांचा मोलाचा सहभाग होता. प्रजासमाजवादी पक्षाचे, जनता दल पक्षाचे क्रियाशील आणि एकनिष्ठ कार्यकर्ते असलेल्या भाईंनी माहीम ग्रामपंचायतीत उपसरपंच, सरपंच अशा जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. माहीम शिक्षण संस्थेचे सचिव, खजिनदार, अध्यक्ष, विश्वस्त, कार्यकारी विश्वस्त, माहीम विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे सभापती इ. पदेही भूषवलेली आहेत. माहीम सामुदायिक सहकारी सोसायटीची स्थापना तसेच महिकावती पोल्ट्री (कुक्कुटपालन) संस्था स्थापना आणि व्यवस्थापनामध्येही त्यांचा पुढाकार होता. भटक्या व विमुक्त जातींच्या विविध संस्थाच्या अध्यक्षपदी कार्य करणाऱ्या भाईंचे भूमिहीनांना जमिनी मिळवून देण्यातले कार्य स्पृहणीय होते. माहीम गावांतील विविध सुधारणांमध्ये भाईंचा सहभाग विशेष राहिला आहे.

संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील सहभागाबद्दलचा तुरुंगवास, सरपंचपदी असताना अंजुमन ट्रस्टच्या माहीम गावाच्या हद्दीतील लागवडीखाली नसलेल्या हजारो एकर जागेतील काही जागा भूमिहीन शेतकऱ्यांना मिळावी म्हणून १९६७ साली झालेल्या आंदोलनाचे नेतृत्व करताना भोगावा लागलेला कारावास, तसेच सन १९७८ साली माहीम गावांतील खराब रस्ते दुरुस्त होत नसल्याच्या निषेधार्थ झालेल्या रस्ताबंद आंदोलनाच्या वेळेस झालेला तुरुंगवास भाईंना लढवय्या बनवत गेला. १९८० साली झालेल्या पान उत्पादक लढ्यात भाईंचं मोलाचं सहकार्य पानवेली बागायतदारांना मिळालं होतं...

ज्ञाती बंधुभगिनींतर्फे भाईंना भावपूर्ण श्रद्धांजली

# श्रद्धांजली

| नाव | गाव | दिनांक | वय |
|---|---|---|---|
| हरेश्वर आप्पा राऊत | माहीम | २९/१/२० | ९३ |
| आशा योगिंद्रनाथ म्हात्रे | जुहू | १/२/२० | ७६ |
| मालती मोरेश्वर राऊत | शिरगाव | ११/२/२० | ८५ |
| जयवंत रामजी पाटील | नांदगाव | १५/२/२० | ७८ |
| विश्वनाथ नारायण पाटील | बोरिवली/मधुकरनगर | १९/२/२० | ८६ |
| विजय पांडुरंग पाटील | वरोर | २०/२/२० | ७७ |
| जयंती जयराम पाटील | माहीम | २१/२/२० | ८५ |
| सुवर्णा नथुराम पाटील | केळवे | ७/३/२० | ६२ |
| कमल काशिनाथ पाटील | नांदगाव | ७/३/२० | ९० |

| नाव | गाव | दिनांक | वय |
|---|---|---|---|
| माधुरी प्रकाश राऊत | पंचाळी | ९/३/२० | ४२ |
| तारामती जयप्रकाश पाटील | पोफरण | १६/३/२० | ९४ |
| शोभना शरदचंद्र पाटील | कल्याण | २०/३/२० | ७२ |
| भाऊराव केशव पाटील | कमारे | २३/३/२० | ८२ |
| दिपक काशिनाथ राऊत | जुहू | २४/३/२० | ६३ |
| बाबुराव दाजी राऊत | ऊमरोळी | २८/३/२० | ८७ |
| करण जितेंद्र राऊत | वरोर | ३१/३/२० | २४ |
| पुष्पलता नारायण राऊत | दहिसर / नरपड | २/४/२० | ७१ |
| अनंत काशिनाथ पाटील | माहीम | २२/४/२० | ७६ |
| मंदाकिनी मधुकर पाटील | मांडे | २/५/२० | ७६ |
| अरविंद यशवंत ठाकूर | विरार / माहीम | २/५/२० | ८० |
| मंदाकिनी शामराव पाटील | पंचाळी | १७/५/२० | ६८ |
| नंदकुमार गजानन पूरव | कुर्ला / माहीम | १९/५/२० | ५९ |
| रत्नमाला रविंद्र राऊत | ठाणे | १९/५/२० | ७८ |
| प्रिती (फिरोज) चंद्रकांत ठाकूर | अंधेरी /माहीम | २१/५/२० | ६२ |
| सुशिला (कुंती) गणपत राऊत | पंचाळी | २६/५/२० | ९३ |
| आशा (बेबीताई) अनंत राऊत | मधुकरनगर | २७/५/२० | ८५ |
| शकुंतला शंकरराव राऊत | माहीम | २८/५/२० | ९१ |
| आशुतोष हिराजी पाटील | घिवली | १/६/२० | ७३ |
| अनंत देवजी राऊत | उमरोळी | १२/७/२० | ७१ |
| स्नेहप्रभा शंकर पाटील | घिवली | २४/७/२० | ५९ |
| शकुंतला पांडुरंग पाटील | केळवे | २९/७/२० | ७२ |
| दिनकर यादव राऊत | उमरोळी | १/८/२० | ८५ |
| रेवती गणपत पाटील | घिवली | १/८/२० | ८७ |
| वत्सला मधुकर राऊत | नरपड | ४/८/२० | ८१ |
| जयप्रकाश जगदिश पाटील | वरोर | ७/८/२० | ६० |
| आत्माराम बाबु राऊत | कुर्ला/ मधुकरनगर | ७/८/२० | ८७ |
| शांतीबाई गणेश पाटील | नरपड | १६/८/२० | ८४ |
| अनंत (वसंत) दामोदर राऊत | नरपड | २०/८/२० | ७२ |
| रुपेश विनायक पाटील | उमरोळी | ३१/८/२० | ४४ |
| दर्शन सुरेंद्र राऊत | विरार / सालवड | १/९/२० | ३२ |
| राजेंद्र प्रभाकर पाटील | अंधेरी / मधुकरनगर | ५/९/२० | ५३ |

| नाव | गाव | दिनांक | वय |
|---|---|---|---|
| नंदा (वेणुबाई) नथुराम राऊत | माहीम | ७/९/२० | ८८ |
| वृषाली सचिन पाटील | दहिसर / पोफरण | ९/९/२० | ३८ |
| हरेश सखाराम राऊत | माहीम | ९/९/२० | ६५ |
| किशोर गजानन पाटील | अल्याळी | १४/९/२० | ६२ |
| अनंत देवजी राऊत | सालवड | १५/९/२० | ८६ |
| कलावती काशिनाथ पाटील | वरोर | १७/९/२० | ८३ |
| सुरेखा संदिप पुरव | बोईसर–मधुकरनगर | २०/९/२० | ५५ |
| सोनाली योगेश राऊत | बोईसर – अल्याळी | २०/९/२० | ३७ |
| अनंत देवजी राऊत | वरोर – मसोली | २८/९/२० | ७५ |
| शोभना शरदचंद्र राऊत | वरोर | २९/९/२० | ७८ |
| प्रभावती पांडुरंग पाटील | नांदगाव | २९/९/२० | ८२ |
| केतन रविंद्र पाटील | बोरिवली/वरोर | १०/१०/२० | ४० |
| रमेश गणपत पाटील | नरपड | १३/१०/२० | ७४ |
| मधुकर सखाराम राऊत | नरपड | १३/१०/२० | ८३ |
| सुर्यकांत गंगाधर चौधरी | जुहु | १८/१०/२० | ८० |
| मार्तंड निळकंठ पाटील | नांदगाव | १९/१०/२० | ९० |
| सुनंदा यादव पुरव | जोगेश्वरी/मधुकरनगर | २०/१०/२० | ७५ |
| वासुदेव नथुराम राऊत | बोरिवली / नरपड | २१/१०/२० | ९३ |
| शंकर नारायण राऊत | माहीम | २३/१०/२० | १०० |
| विमल कमळाकर राऊत | माहीम | २४/१०/२० | ८६ |
| सचिंद्र (शशी) पद्माकर पाटील | वरोर | २७/१०/२० | ५३ |
| प्रताप काशिनाथ राऊत | दहिसर / नरपड | ३०/१०/२० | ७८ |
| स्मिता विजय राऊत | मधुकरनगर | १/११/२० | ६८ |
| शशिकांत लक्ष्मण राऊत | अल्याळी | २/११/२० | ७७ |
| वनिता सुर्यकांत चौधरी | जुहु | ५/११/२० | ७८ |
| प्रभावती रामचंद्र पाटील | बेटेगाव | ६/११/२० | ८५ |
| रेखा किशोर पाटील | दहिसर / नरपड | १०/११/२० | ६५ |
| मुरलीधर रघुनाथ पाटील | बोरिवली / नरपड | ११/११/२० | ६७ |
| जगन्नाथ शांताराम पाटील | कमारे | १९/११/२० | ७५ |
| हरिश्चंद्र माधव पाटील | माहीम | २१/११/२० | ८४ |
| अविनाश दामोदर राऊत | जुहु | २३/११/२० | ६० |

| नाव | गाव | दिनांक | वय |
|---|---|---|---|
| आशा अरविंद पाटील | कांदिवली / सातपाटी | ४/१२/२० | ७३ |
| नरेंद्र रघुनाथ पाटील | नरपड | ५/१२/२० | ७१ |
| रघुनाथ सखाराम राऊत | माहीम | ८/१२/२० | ९० |
| दिपेश मोरेश्वर राऊत | शिरगाव | ९/१२/२० | ४५ |
| शकुंतला सिताराम राऊत | नरपड | १२/१२/२० | ७७ |
| रश्मिकांत नथुराम पाटील | अंधेरी / केळवे | १९/१२/२० | ६९ |
| रघुनाथ नाना पाटील | घिवली | ३१/१२/२० | ८४ |
| मोहनिष संजय राऊत | मांडे | १०/०१/२१ | ३७ |
| दिनानाथ हिरा राऊत | चिंचणी | १०/०१/२१ | ८२ |
| हरिश्चंद्र विठ्ठल पाटील | वरोर | १६/०१/२१ | ९३ |
| कमल नागेश राऊत | माहीम | १८/०१/२१ | ८६ |
| जयश्री जनार्दन पुरव | घाटकोपर/माहीम | १९/०१/२१ | ८५ |
| आशिष दत्तात्रय राऊत | बेटेगाव | २६/०१/२१ | ४३ |
| कुमुदिनी काशिनाथ राऊत | सालवड | ०१/०२/२१ | ९१ |
| मालती (मनू) मधुकर राऊत | सालवड | ०२/०२/२१ | ८२ |
| हर्षद (प्रशांत) यशवंत पाटील | कांदिवली/वरोर | ०३/०२/२१ | ५९ |
| वनिता(कुसुम) विपीनचंद्र पाटील | कमारे | ५/२/२०२१ | ७२ |
| राजश्री(भारती) राजेंद्र पाटील | पोफरण | ०५/०२/२१ | ५७ |
| द्वारकानाथ गणपत पुरव | मधुकरनगर | १०/०२/२१ | ८१ |

**बुक - पोस्ट**

प्रति,
श्री. / श्रीमती ______________________________

______________________________

प्रेषक –
**संपादक,** वृत्तपत्रिका संपादन समिती, सो. पा. क्ष. स. संघ ट्रस्ट फंड
डॉ. मधुकर बळवंत राऊत स्मारक समाज मंदिर, जुना पालघर बोईसर रोड, ता.जि. पालघर–४०१,४०४
मोबाईल : ९०७६३४१९१० वृत्तपत्रिका ई–मेल - **spksstvpatrika@gmail.com**
संपादक : **श्री. दिनेश वासुदेव पाटील**
**प्रकाशक : मुख्य चिटणीस, सो.पा.क्ष.स.संघ ट्रस्ट फंड**
रजिस्ट्रेशन ऑफ न्यूज पेपर, भारत सरकार नोंदणी क्रमांक जी १६५/३२२/९९
प्रसिद्धी स्थळ : कर्मवीर ज. पा. राऊत ग्रंथालय, विठ्ठलेश, दामोदर म्हात्रे मार्ग, दहिसर (प.), मुंबई – ६८.
मुद्रक : ग्राफिक प्रिंटर्स, कस्तूरपार्क, शिंपोली, मुंबई – ९२. दूरध्वनी : २८९९९३३०, ९३२२८४०८४६
email : graphic_printers29@rediffmail.com